महाराष्ट्र शासन

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर

सक्करदरा चौक, उमरेड रोड, राजे रघुजी नगर, नागपूर-४४००२४

| ☎कार्यालय : (०७१२) २७४९१९८ | अधिष्ठाता : (०७१२) २७५७००२ | ई मेल :govtayurcollegenagpur@gmail.com |
|---|---|---|

क्र.शाआमना/आस्था/कंत्राटीपध्दत/रिक्त पदे/जाहिरात/ 3281 /२०२४,  दि. 6/6/2024

## कंत्राटी पध्दतीने अध्यापक तसेच अध्यापकेत्तर पदे भरणेबाबत

**संदर्भ :-**
१) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रं.एमईएस ५०८/प्र.क्रं.९४/०८/वैसेवा-१, दिनांक ७ सप्टेबर २०११
२) शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रं.आयुसे-१०२४/ प्र.क्र१३० (भाग-१)/आयु-१, दि.०४.११.२०२२
३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. आसंमुं/आस्था/अध्यापकेत्तर पदे/कंत्राटी/नियुक्ती/२०२४/आयु-३/२१९५-२२१०, दि.२३.०२.२०२४

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर येथील विविध विषयांच्या प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक पदांवर ११ महिन्यांसाठी तसेच शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर येथील पंचकम वैद्य व अपघात वैद्यकीय अधिकारी या पदावंर १ वर्षाचे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यासाठी इच्छुक व पात्र उमेद्वारांकडून परिशिष्ट "अ" च्या नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने उपलब्ध असलेल्या पदांचा विषय व तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**रिक्त पदांचा तपशिल :**

**अध्यापकीय पदे**

| विषय | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|---|
| | एकूण पदे | एकूण पदे | एकूण पदे |
| शारिररचना | ०१ | ०१ | ०० |
| शालाक्यतंत्र | ०१ | ०१ | ०१ |
| कौमारभृत्य | ०० | ०१ | ०० |
| अगदतंत्र | ०१ | ०० | ०० |
| शल्यतंत्र | ०० | ०० | ०१ |
| पंचकर्म | ०० | ०१ | ०० |
| रसशास्त्र | ०० | ०१* | ०२ |
| स्त्रीरोग प्रसुतीतंत्र | ०० | ०० | ०१ |
| **एकुण रिक्त पदे** | **०३** | **०५** | **०५** |

* दि.३०.०६.२०२४ रोजी रिक्त होण्याचे अधिन राहून

**अध्यापकेत्तर पदे**

| पदनाम | रिक्त पदांची संख्या | प्रतिपद/प्रतिमाह मानधन |
|---|---|---|
| पंचकर्म वैद्य | ०१ | ५०,०००/- |
| अपघात वैद्यकीय अधिकारी | ०१ | ५०,०००/- |

टिप :- मुलाखतीच्या दिवसापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन/पदोन्नतीने किंवा स्थलांतराने संबधीत विषयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक/सहाय्यक प्राध्यापक तसेच पंचकर्म वैद्य/अपघात वैद्यकीय अधिकारी पदाचा पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्या संबधीत विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक किंवा सहाय्यक प्राध्यापक तसेच पंचकर्म वैद्य व अपघात वैद्यकीय अधिकारी पदासाठी केलेल्या अर्जाचा कंत्राटी पध्दतीने नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

| पदनाम | प्राध्यापक |
|---|---|
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अध्यापकांना प्राधान्य.) |
| शैक्षणिक अर्हता | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केद्रींय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी संबंधीत विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करणे गरजेचे आहे.<br>३) ज्या उमेद्वारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेद्वारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४) राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक सांकेतांक (Teacher Code) असणे आवश्यक आहे.<br>५) मराठी, हिंदी, इग्रंजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरित्या लिहीण्यास, बोलण्यास व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतरचा, संबंधीत आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल. त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधीत आयर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक पदाचा किमान पाच वर्ष अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहिल. |
| मानधन | प्रतिमाह रु.१,००,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञये असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे"१० - कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून अदा करण्यात येईल. |

| पदनाम | सहयोगी प्राध्यापक |
|---|---|
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अध्यापकांना प्राधान्य.) |
| शैक्षणिक अर्हता | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केद्रींय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी संबंधीत विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करणे गरजेचे आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | ३) ज्या उमेद्‌वारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वत:चे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेद्‌वारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४) राष्ट्रीय आयोगाने निश्चित केलेला शिक्षक सांकेतांक (Teacher Code) असणे आवश्यक आहे.<br>५) मराठी, हिंदी, इग्रंजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरित्या लिहीण्यास, बोलण्यास व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | | शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्यानंतरचा, मान्यताप्राप्त संस्थेतील संबंधीत आयुर्वेदिक विषयाचा सहाय्यक प्राध्यापक या पदाचा पाच वर्षाहून कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतुन संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून तीन वर्षे अध्यापनाचा अनुभव आवश्यक राहील. |
| मानधन | | प्रतिमाह रु.८०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञये असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे"१० - कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून अदा करण्यात येईल. |

| पदनाम | | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|
| वयोमर्यादा | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अध्यापकांना प्राधान्य.) |
| शैक्षणिक अर्हता | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केर्द्रीय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी संबंधीत विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करणे गरजेचे आहे.<br>३) ज्या उमेद्‌वारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वत:चे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेद्‌वारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>४) मराठी, हिंदी, इग्रंजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरित्या लिहीण्यास, बोलण्यास व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| मानधन | | प्रतिमाह रु.७०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञये असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे"१० - कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून अदा करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| पदनाम | पंचकर्म वैद्य |
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष |
| Minimum Educational Qualification Essential | Post-Graduate Degree in Panchakarma subject of Ayurved, obtained from Recognized Institution i.e.an Ayurvedic College recognized by CCIM/NCISM under the Indian Medical Central Council Act,1970 (48 of 1970) and affiliated to Maharashtra University of Health Science, Nashik |
| मानधन | प्रतिमाह रु.५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञये असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे"१० - कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून अदा करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| पदनाम | अपघात वैद्यकीय अधिकारी |
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष |
| Minimum Educational Qualification Essential | Post-Graduate Degree in Kayachikitsa or Shalyatantra subject of Ayurved, obtained from Recognized Institution i.e. an Ayurvedic College recognized by CCIM/NCISm under the Indian Medical Central Council Act,1970 (48 of 1970) and affiliated to Maharashtra University of Health Science, Nashik |
| Minimum Essential Exprience | Practical Experiecne-Not less than 2 Years as a Panchakarma Vaidya or Medical officer in a hospital registred under Bombay Nursing Home Act 1949, after he/she has gained educational qualification |
| मानधन | प्रतिमाह रु.५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञये असणार नाहीत.) तसेच सदर मानधन हे"१० - कंत्राटी सेवा" या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या अधिन राहून अदा करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| **इतर अटी** | १. | उमेदवार भारताचा नागरिक असावा. |
| | २. | कंत्राटी पध्दतीने करावयाच्या अध्यापकीय पदांच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेद्वार उपलब्ध होईपर्यंत अथवा ११ महिन्यांच्या कालावधीकरिता, यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील.<br>तसेच कंत्राटी पध्दतीने करावयाच्या अध्यापकेत्तर पदांच्या (पंचकर्म वैद्य व अपघात वैद्यकीय अधिकारी) नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेद्वार उपलब्ध होईपर्यंत अथवा ०१ वर्षाच्या कालावधीकरिता, यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. |
| | ३. | नियुक्तीसाठी बाह्यशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेद्वार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | ४. | अध्यापकीय पदावर नियमित उमेद्वारांची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस अथवा ११ महिन्यानंतर कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल.<br>तसेच अध्यापकेत्तर पदावर नियमित उमेद्वारांची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस अथवा १ वर्षानंतर कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | ५. | कंत्राटी पध्दतीने नियुक्त उमेद्वाराने प्रस्थापित मानकानुसार अध्यापन, रुग्णसेवा (आकस्मिक रुग्णसेवेसह) तसेच विभागप्रमुख व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील. तसेच नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेद्वारांचे कामाचे तास राहतील. (परिशिष्ट - ब) |
| | ६. | वरिलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेद्वारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील. |
| | ७. | अ) कंत्राटी पध्दतीवरील नियुक्त उमेद्वारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही. तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही. अशा आशयाचे बंधपत्र या कार्यालयास सादर करावे लागेल. (परिशिष्ट - क)<br>ब) कंत्राटी पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकीय/अध्यापकेत्तर उमेद्वारांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत. अशा आशयाचे बंधपत्र या कार्यालयास सादर करावे लागेल. (परिशिष्ट - क) |
| | ८. | उमेद्वाराचे कामकाज समाधानाकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी नियुक्ती कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय संपुष्टात येईल. |
| | ९. | उमेद्वारास सार्वजनिक सुट्टी आणि रविवार व्यतिरिक्त फक्त ८ नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. परंतू अशा शासकीय सुट्टयांमध्ये गरजेप्रमाणे महाविद्यालयात किंवा रुग्णालयात सेवा देणे गरजेचे राहील. |
| | १०. | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील. |
| | ११. | कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान केले जाणार नाहीत. |
| | १२. | शासन निर्णय दि.१५.०२.१९९५ अन्वये सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेले वेतन वजा निवृत्तीवेतन अशी जी एकूण रक्कम येईल ती रक्कम परिश्रामिक म्हणून देण्यात येईल. मात्र परिश्रामिकांची रक्कम कंत्राट पध्दतीने नियुक्ती करण्यात येणा-या पदाच्या परिश्रामिकांच्या कमाल टप्प्यांपेक्षा जास्त असणार नाही. |
| | १३. | कंत्राटी पध्दतीने नियुक्ती दिलेल्या उमेद्वारास राजीनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय तथा रुग्णालय, नागपूर यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्यांचा/तीचा राजीनामा अधिष्ठातांना मंजूर करता येईल. |
| | १४. | नियुक्ती आदेशात नमुद विहित कालावधीच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. |
| | १५. | संदर्भाधिन शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबंधीचे तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबंधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधीतास बंधनकारक राहील. (परिशिष्ट - ड) |

| | | |
|---|---|---|
| | १६. | नियुक्ती प्रकियेच्या कोणत्याही टप्प्यावर फेरबदल करण्याचे किंवा करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |
| | १७. | उमेद्‌वार अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील तसेच मुलाखतीवेळी मुळ ना-हरकत प्रमाणपत्र सोबत असणे आवश्यक राहील. (शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर येथे सद्यस्थितीत कंत्राटी पध्दतीने कार्यरत असणा-या व नजिकच्या कालावधीत सेवा समाप्त होणा-या, कंत्राटी अध्यापकांना अनुभव व नाहरकत प्रमाणपत्राची गरज राहणार नाही) तसेच उमेद्‌वारांची निवड झाल्यास रुजू होतेवेळी संबंधीत संस्थेचे मुळ कार्यमुक्ती आदेश सोबत असणे आवश्यक राहील. त्याचप्रमाणे भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांचे ऑन लाईन अध्यापक विनियोजन पध्दतीच्या (OTMS) पोर्टल वरुन डि-लिंक करवून घेणे तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ चे अंतर्गत (MCIM) पंजीयन आवश्यक राहील. (ना-हरकत प्रमाणपत्राचा नमुना - परिशिष्ट - इ) |
| | १८. | कंत्राटी पध्दतीने कार्यरत अध्यापकीय उमेद्‌वाराने वयाची ६५ वर्षे पुर्ण केल्यानंतर त्यांची सेवा आपोआप समाप्त होईल.<br>तसेच कंत्राटी पध्दतीने कार्यरत अध्यापकेत्तर उमेद्‌वाराने वयाची ५८ वर्षे पुर्ण केल्यानंतर त्यांची सेवा आपोआप समाप्त होईल. |
| | १९. | सदर अध्यापकीय व अध्यापकेत्तर पदे ही कंत्राटी पध्द्तीने भरावयाची असल्याने, त्यासाठी कोणतेही आरक्षण लागू राहणार नाही |
| | २०. | सदर पदांचे मानधन "कंत्राटी सेवा - १०" या लेखाशिर्षाखाली मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात येणार असल्याने, लेखाशिर्षाखाली अनुदान मंजूर नसल्याचे स्थितीत परिश्रमीकासाठी कार्यालयाकडे तगादा लावता येणार नाही. |
| | २१ | प्रथमतः प्राप्त अर्जांची संख्या, उपलब्ध पदांच्या संखेपेक्षा अत्याधिक असल्यास निकषांप्रमाणे चाळणी लावून पात्र उमेद्‌वारांपैकी विहित अनुपातात उमेद्‌वारांना मुलाखतीस आमंत्रीत करण्यात येईल. |
| | २२ | पात्र उमेद्‌वारांची व मुलाखतीस आमंत्रीत उमेद्‌वारांची यादी महाविद्यालयाचे संकेत स्थळावर (www.gacnagpur.org) प्रकाशित करण्यात येईल. तसेच मुलाखतीसाठीचे मुलाखत पत्र संबंधित उमेद्‌वारांचे फक्त ई-मेल पत्त्यावर पाठविण्यांत येईल. अन्य कोणत्याही मार्गाने सुचना देण्यात येणार नाही. त्यामुळे ई-मेल पत्ता सुस्पष्ट लिहिण्यात यावा. याबाबत कोणताही आक्षेप मान्य करण्यात येणार नाही. |
| | २३ | सन २०२३-२४ मध्ये NCISM निरीक्षणावेळी इतर संस्थेमध्ये दर्शविण्यात आलेल्या उमेद्‌वारांचा मुलाखतीकरीता विचार केला जाणार नाही. |
| | २४ | कंत्राटी पध्दतीने कार्यरत उमेद्‌वारांना स्थायित्वाचे तसेच ई.पी.एफ बाबतचे कोणतेही फायदे मिळणार नाहीत. |
| | २५ | निवड झालेल्या उमेद्‌वाराच्या विद्यापीठ मान्यताप्राप्त अनुभव व Teacher Code किंवा राष्ट्रीय केंद्रीय चिकित्सा आयोग (NCISM) यांचे मान्यताप्राप्त अनुभव व Teacher Code याबद्दल कुठलीही तक्रार प्राप्त झाल्यास त्यांच्या सेवा तात्काळ संपुष्ठात येतील. |
| | २६ | नियुक्ती संदर्भाने कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास कार्यालयाचा मुळ मराठी आदेशच ग्राहय धरण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | २७ | **सहाय्यक प्राध्यापकांचे उमेद्वारांसाठी चाळणीचे निकष खालील प्रमाणे असतील**<br>अ) बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमातील विषयाचे वर्षाचे एकूण गुण प्रतिशत अधिक संबंधित विषयाचे गुण प्रतिशत यांचे सरासरी नुसार गुणवत्ताक्रम लावून चाळणी करण्यात येईल.<br>ब) संबधित विषयाचे वर्षात उत्तीर्ण प्रयत्न (Attempt) एकापेक्षा अधिक असल्यास प्रत्येक अतिरिक्त प्रयत्नासाठी एक अंक वजा करण्यात येईल. संबधित विषयाचे वर्षाशिवाय अन्य वर्षात एकापेक्षा अधिक प्रयत्न (Attempt) असल्यास प्रत्येक अतिरिक्त प्रयत्नासाठी १/२ (अर्धा) अंक वजा केल्या जाईल.<br>क) गुणवत्ता यादीमध्ये समानता असल्यास खालील प्रमाणे प्राधान्य क्रमाचे निकष लावले जातील<br>१) संबंधीत विषयाच्या वर्षाचे एकत्रित (Aggregate) गुण<br>२) एकत्रित गुण समानता असल्यास संपुर्ण व्यावसायीक अभ्यासक्रमाचे एकत्रित (Aggregate) गुण<br>३) संपुर्ण अभ्यासक्रमाचे एकत्रित गुण समान असल्यास वयाधिक्याला प्राधान्य देण्यात येईल. |
| | २८ | सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकांसाठी अत्त्युच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव काळाचे चाळणी निकष लावण्यात येतील. |

तरी, इच्छुक उमेद्वारांनी www.mahaayush.gov.in तसेच www.gacnagpur.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेल्या विहित नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक मुळ प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकीत प्रतींसह अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, राजे रघुजी नगर, सक्करदरा चौक, उमरेड रोड नागपूर - ४४००२४ येथे दिनांक १९.०६.२०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष पोहोचतील या बेताने पाठवावे. नमुद दिनांक व वेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची दक्षता संबंधीत उमेद्वारांनी घ्यावी. टपालाने विहित कालमर्यादेनंतर येणा-या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. ई-मेल द्वारे पाठविण्यांत आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**कंत्राटी पध्दतीच्या भरतीसाठीचे संभावित वेळापत्रक खालील प्रमाणे असेल. त्यात प्रासंगिक बदल करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव असतील.**

१) अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ :- दिनांक १९.०६.२०२४, संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत

२) पात्र उमेद्वारांची तात्पुरती यादी www.gacnagpur.org या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याचा संभावित दिनांक :- २२.०६.२०२४
(या तारखेमध्ये काही अपरिहार्य व तांत्रिक कारणास्तव विलंब होणार असल्यास तसे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल)

३) मुलाखतीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे www.gacnagpur.org या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात येईल.

(वैद्य सु.य.राऊत)
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर

परिशिष्ट - अ

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर

# APPLICATION PROFORMA

Passport Photo

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Post applied | | Subject | | NCISM Teacher Code | |
| | | | | MCIM Reg.No. | |

| | | |
|---|---|---|
| Full Name in capital letters | | Sex M/F |
| POSTAL ADDRESS | | |
| | | |
| | | |
| | City : Dist : Pin code : | |
| CONTACT DETAILS | Phone : (with STD Code) Cell No. e-mail : | |
| BIRTH DATE (Attach SLC) | In Numerical : / / In Words : Completed Age (On the day of application): Years - Months- Days- | |
| Religion : | Category : SC/ST/VJNT/SBC/OBC/OPEN | Cast : |

QUALIFICATIONS (Attach all relevant Certificates)

| COURSE | Name of the Course | University or Board | Passing Year | No.of Attempt | Marks out of | Percentage % |
|---|---|---|---|---|---|---|
| Undergraduate | I st BAMS | | | | / | |
| | II nd BAMS | | | | / | |
| | III rd BAMS | | | | / | |
| | IV th BAMS | | | | / | |
| | | | | | / | |
| Subject -------------------- | | | | | | |
| Post Graduate | MD/MS Subject : | | | | | |
| Doctorate | Ph.D. | | | | | |

| Computer | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

## EXPERIENCE

(Attach all relevant Certificates & Approvals. Starting form Present/Latest job at Sr.No.01)

| Sr. No. | Name of the College | Designation/ Post held | Period of Experience | | | MUHS Approval Letter No. & Date |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | From | To | Duration | |
| 1. | | | | | | |
| 2. | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4. | | | | | | |
| 5. | | | | | | |

Total UG Teaching Experiecne :

Total PG Teaching Experience :

| Sr. No. | Research Activities / Paper Publications (State Briefly, Attach Separate list & details, if required.) | Total No. |
|---|---|---|
| 1. | Books or Chapters (Text Book) | |
| 2. | Research Paper Publications In Peer Review Journal (Attach (first page of Research paper) | |
| 3. | Paper Presentations in National/International Seminar | |

1. Attach self attested copies of all necessary documents. Please attach separate sheet, if required.
2. In - service candidates shall submit NOC
3. Application should be complete in all respect. Write Not Applicable in the column which are blank.
4. Inomplete Applications, Applications without / or un-attested copies of documents will be rejected.

Date :

Appplicant Signature

## परिशिष्ट – ब

### DUTIES & RESPONSIBILITIES (AS PER MAHARASHTRA GOVT.RULES :)

**PROFESSOR :**

1) The Professor will have to teach the subject to the student in the college as per the instruction of the HOD of his/her subject in the college.
2) In case of Clinical subjects, he/she will have to impart clinical instruction in his/her subject to the students in the college as per the instruction of the HOD of his/her subject in the college.
3) He/She will have to assist the HOD of his subject in the development of his/her department and maintain it up to date.
4) He/She will be responsible for completion of his subjects assigned by HOD within the prescribed period.
5) He will have to assist the HOD of his/her subject in carrying out research in the concerned subject.
6) He/She will have to carry out any other duties as may be assigned to him/her by his/her HOD and Dean of the college.
7) He/She will have to attend all clinical duties as per requirement.

**ASSOCIATE PROFESSOR :**

1) The Associate Professor will have to teach the subject to the student in the college as per the instruction of the Professor/HOD of his/her subject in the college.
2) In case of Clinical subjects, he/she will have to impart clinical instruction in his/her subject to the students in the college as per the instruction of the Professor of his/her subject in the college.
3) He/she will have to assist the professor/HOD of his subject in the development of his/her department and maintain it up to date.
4) He will have to assist the professor of his/her subject in carrying out research in the concerned subject.
5) He/She will have to carry out any other duties as may be assigned to him/her by his/her Superiors.
6) He/She will have to attend all clinical duties as per requirement.

**ASSISTANT PROFESSOR :**

1) To assist the Professor/Associate Professor in theory, Practical and clinical teaching of the subject to the undergraduates.
2) To assist the Professor in Ward works in case of clinical subjects.
3) To perform duties in the O.P.D. in case of clinical subjects.
4) To attend patients in emergency situation whenever required.
5) To assist in P.G. teaching Courses.
6) To relieve the residents as and when required.
7) To help the Professor in research work.
8) To perform such other duties in the Hospital and O.P.D. as assigned by the Professor or the Dean.

# परिशिष्ट "क"

मी श्री/श्रीमती/कुमारी................................................ प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/ करते की, वर नमूद केलेली माहीती पूर्णतः खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

# परिशिष्ट "ड"

मी श्री/श्रीमती/कुमारी.................................................... प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/ करते की, संदर्भाधिन शासन निर्णयातील अटी व शर्तींचे पालन करुन, कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल करणार नाही. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करीन.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

## परिशिष्ट - ई

### ना-हरकत प्रमाणपत्र

प्रमाणिक करण्यात येते की, वैद्य/वैद्या.............................................. या महाविद्यालयात दिनांक .....................पासून........................या पदावर कार्यरत आहेत. वैद्य/वैद्या..............................................यांची शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूर येथे प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक पदावर करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास महाविद्यालय त्यांना कार्यमुक्त करेल व त्यांच्या या मुलाखतीस महाविद्यालयाची व संस्थेची काहिही हरकत नाही.

| संस्थाप्रमुख | प्राचार्य |
| --- | --- |
| ............................ | ............................ |
| ............................ | ............................ |
| ठिकाण: | ठिकाण : |
| दिनांक : | दिनांक : |